सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता कृषि उन्नती योजना- एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान या योजनेंतर्गत केंद्र तसेच राज्य हिश्याचा निधी वितरीत करण्याबाबत.. (लेखाशिर्ष- २४०१ ए०२९ केंद्र हिस्सा आणि २४०१ ए०११ राज्य हिस्सा)

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बीयुडी -२०१८/ प्र.क्र.११ / कार्यासन ६
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
दिनांक :- ५ मार्च, २०१९.

वाचा -

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अर्थसं-२०१८ /प्र.क्र.६९ / अर्थ-३, दि.०२.०४.२०१८ व दि.२५.०१.२०१९.
२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग समक्रमांक दि.३.०७.२०१८
३) कृषि व पदुम विभागाची नस्ती क्र. राफअ-२०१८ / प्र. क्र.१७७ / ९-अे.

शासन निर्णय-

केंद्र पुरस्कृत कृषि उन्नती योजना, एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान या योजनेंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी मागणी क्र.टी-५, २४०१, पीक संवर्धन, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाति क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना, राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (०६) एकात्मिक फलोत्पादन विकासासाठी केंद्र पुरस्कृत अभियान (६० टक्के केंद्र हिस्सा) लेखाशिर्ष (२४०१ ए०२९), ३३- अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली रु.१३५८.७८ लाख (मूळ अर्थसंकल्पित -रु.९८८.७४ लाख + पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित रु.३७०.०४ लाख) इतका निधी (केंद्र हिस्सा), तर (०१)(०७) एकात्मिक फलोत्पादन विकासासाठी केंद्र पुरस्कृत अभियान (४० टक्के राज्य हिस्सा) लेखाशिर्ष (२४०१ ए०११), ३३- अर्थसहाय्य या लेखाशिर्षाखाली रु.८३९.९७ लाख (मूळ अर्थसंकल्पित -रु.६५९.१६ लाख + पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित रु.१८०.८१ लाख) इतका निधी (राज्य हिस्सा), सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्पित करण्यात आला आहे. सदर तरतुदीपैकी केंद्र हिश्श्याकरीता रु.५१३.०० लाख व समरुप राज्य हिश्श्याकरीता रु.३४२.०० लाख इतका निधी संदर्भाधिन क्र.२ येथे नमूद शासन निर्णयान्वये कृषी विभागास वितरीत करण्यात आलेला आहे.

२. केंद्र शासनाने सदरहू योजनेंतर्गत सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता दुसऱ्या हप्त्यापोटी रु.४५०.०० लाख इतका निधी वितरीत केला आहे. त्यास अनुसरुन कृषि व पदुम विभागाच्या वाचा क्र. ३ येथील प्रस्तावाच्या अनुषंगाने केंद्र हिश्श्याकरिता लेखाशिर्ष (२४०१ ए०२९), ३३- अर्थसहाय्य याखाली रु. ४५०.०० लाख (अक्षरी रुपये चार कोटी पन्नास लाख फक्त) इतका निधी तर त्यास समरुप राज्य हिश्श्याकरिता लेखाशिर्ष (२४०१ ए०११), ३३- अर्थसहाय्य याखाली रु. ३००.०० लाख (अक्षरी रुपये तीन कोटी फक्त) इतका निधी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता प्रशासकीय विभाग प्रमुख म्हणून सचिव (कृषि), कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर (BEAMS) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

३. सदर निधी अर्थसंकल्पीय निधी वितरण प्रणालीवर वितरीत करण्यात आला आहे. नियंत्रक अधिकारी / विभागप्रमुख यांनी खर्चासंबंधीच्या सध्याच्या शासकीय धोरणास अनुसरुन मंजूर आराखडयानुसार याच वर्षात सदर निधी खर्च होईल याची दक्षता घ्यावी. तसेच उपलब्ध करुन दिलेल्या तरतूदीतून झालेल्या खर्चाचा अहवाल, लेखाशिर्षनिहाय / उपलेखाशिर्षनिहाय तसेच साध्य झालेले भौतिक उद्दिष्टनिहाय माहिती, निधी उपयोगिता प्रमाणपत्र, संबंधित क्षेत्रिय अधिकारी यांनी आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक; संबंधित अपर आयुक्त, आदिवासी

विकास; आदिवासी विकास विभाग व कृषि व पदुम विभाग यांना प्रत्येक महिन्याच्या १० तारखेपर्यंत पाठवणेबाबत सूचना देण्यात यावी.

४. नियंत्रक अधिकारी व विभाग प्रमुख यांनी आदिवासी उपयोजना क्षेत्रात अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रात तसेच आदिवासी उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर केलेला खर्च स्वतंत्रपणे नोंदविला जाईल याची दक्षता घ्यावी. जेणेकरुन शासनाला आदिवासी क्षेत्रातील व उपयोजने क्षेत्राबाहेरील योजनांवर होणा-या खर्चावर लक्ष ठेवता येईल.

५. आदिवासी घटक कार्यक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिलेली तरतूद फक्त आदिवासी लाभार्थ्यांकरिता व आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत खर्च करण्यात यावी. तसेच आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर केलेली तरतूद त्या क्षेत्रातील आदिवासी लाभार्थ्यांकरिताच खर्च करण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाने **वाचा** येथील क्रमांक १ अन्वये विभागास प्रदान केलेल्या अधिकारान्वये तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.५३ अर्थोपाय, दि.५/०२/२०१९ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३०११९१३३८१९२४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2019.03.05 16:05:54 +05'30'

रविंद्र दि.औटे
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग,मंत्रालय, मुंबई.
२. आयुक्त(कृषि) , महाराष्ट्र राज्य,पुणे.
३. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक / नागपूर / ठाणे / अमरावती.
५. सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प.
६. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
७. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
८. वित्त विभाग / नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
९. कार्यासन क्र. २ व ९, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
१०. निवड नस्ती (का.६), आदिवासी विकास विभाग.